महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==================================================================

जावक क्रमांक –८४२/११८ दिनांक :- १५ सप्टेंबर, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# तेराव्या म्हाडा लोकशाही दिनात १५ अर्जांवर सुनावणी

मुंबई, दि. १५ सप्टेंबर, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवनात तेरावा लोकशाही दिन आयोजित करण्यात आला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या लोकशाही दिनात नागरिकांच्या १५ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

आजच्या लोकशाही दिन कार्यक्रमात ‘म्हाडा’चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी नागरिकांप्रती जबाबदारी, पारदर्शकता आणि न्यायप्रिय प्रशासनाचे महत्त्व अधोरेखित करत तत्परतेने निर्णय घेतले.

सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासत 'म्हाडा'तर्फे आज अभूतपूर्व निर्णय घेण्यात आला. कामाठीपुरातील जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील श्री. दौलत अधिकारी यांचा सुमारे १५ वर्षांपासून प्रलंबित राहिलेला बृहत सूचीवरील पात्रतेचा प्रश्न निकाली काढत 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांनी अर्जदाराला तात्काळ न्याय मिळवून दिला आहे. कामाठीपुरामधील जुन्या उपकरप्राप्त इमारतीत वास्तव्यास असलेले अधिकारी कुटुंब सन १९७६ मध्ये म्हाडातर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या विक्रोळी येथील संक्रमण शिबिरात स्थलांतरित झाले. दरम्यान, कामाठीपुरामधील त्यांच्या इमारतीचा पुनर्विकास होऊ शकला नाही, त्यामुळे श्री. अधिकारी यांनी मंडळाच्या बृहत सूचीवरील कायमस्वरूपी गाळा मिळण्यासाठी सन २०१० मध्ये अर्ज केला. कागदपत्रांच्या त्रुटीमुळे श्री. अधिकारी यांची पात्रता सुमारे १५ वर्षांपासून प्रलंबित राहिली होती. संक्रमण शिबिरात वास्तव्यास असलेल्या श्री. अधिकारी यांनी लोकशाही दिनाच्या माध्यमातून श्री. संजीव जयस्वाल यांच्यासमोर आपले म्हणणे मांडले . श्री. जयस्वाल यांनी अर्जदाराचे म्हणणे समजावून घेतले व मंडळाच्या अधिकाऱ्यांना तातडीने या प्रकरणी सुनावणी घेण्याचे आदेश दिले. लोकशाही दिन झाल्यानंतर काही तासांतच मंडळाच्या अधिकाऱ्यांनी श्री. दौलत अधिकारी यांची सुनावणी घेतली व तात्काळ त्यांच्या पात्रतेचा निर्णय जाहीर केला. श्री. अधिकारी यांना मंडळातर्फे अवघ्या ४ तासातच बृहत सूचीवर पात्र घोषित करण्यात आले व त्यांच्या हक्काचे कायम स्वरूपी घर मिळण्यासाठी पात्रता निश्चितीचे पत्र देखील देण्यात आले.

श्री. ज्ञानदेव ओरोसकर यांनी लोअर परळ येथील तुळशी बिल्डिंगच्या पुनर्विकासात सदनिकेचे मोजमाप करताना पोटमाळा गृहीत धरलेला नसल्याने पोटमाळा सदनिकेच्या एकूण क्षेत्रफळात समाविष्ट करावा, या मागणीसाठी आजच्या लोकशाही दिनात अर्ज केला. श्री. जयस्वाल यांनी उपमुख्य अभियंता यांनी सदर प्रकरणी येत्या सात दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी यांच्या मान्यतेने निर्णय घ्यावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

श्री. साहेबराव गायकवाड पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील गृहनिर्माण योजनेमध्ये संगणकीय सोडतीद्वारे अत्यल्प उत्पन्न गटाच्या सदनिकेसाठी यशस्वी अर्जदार ठरले आहेत. मात्र, राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी असलेल्या श्री. गायकवाड यांना कौटुंबिक, आर्थिक अडचणींमुळे सदनिकेची विक्री किंमत भरण्यास उशीर झाला परिणामी म्हाडा पुणे मंडळातर्फे रु. ७५,०००/- विलंब शुल्क त्यांच्याकडून आकारण्याचे पत्र देण्यात आले. सदर विलंब शुल्क माफ करण्याबाबत त्यांनी आज लोकशाही घेण्यात अर्ज केला होता. सदर अर्ज प्रकरणी सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी माणुसकीच्या भावनेतून व अर्जदार यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता रु. ७५,०००/- विलंब शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

श्री. गायकवाड यांनी  सदनिकेची विक्री किंमत भरलेली असल्याने सदनिकेचा ताबा तात्काळ उद्याच देण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी पुणे मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

श्रीमती रिद्धी वाजे या म्हाडाच्या संगणकीय सोडतीतील लाभार्थी आहेत. मात्र, यांच्या नावावर म्हाडाच्या दोन सदनिका असल्याचे मंडळाच्या  निदर्शनास आले. त्यामुळे नुकत्याच झालेल्या संगणकीय सोडतीतील सदनिकेचा ताबा त्यांना मंडळातर्फे  देण्यात आला नाही. सदनिकेचा ताबा देण्याविषयी त्यांनी आजच्या लोकशाही दिनामध्ये अर्ज केला होता. मंडळाच्या नियमांनुसार अर्जदार कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेचा एकदाच लाभ घेऊ शकतो,  या नियमावर आधारित दोन पैकी एक सदनिका परत घेऊन नुकत्याच सोडतीत लागलेल्या सदनिकेचा ताबा संबंधित अर्जदार यांना द्यावा, असे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

श्री. कमलेश समदानी यांनी गिरगाव मधील मानेक बिल्डिंग व बाई मोतीबाई टेम्पल ट्रस्ट बिल्डिंगमधील दोन खोलींचा ताबा मिळणेबाबत आजच्या लोकशाही दिनात अर्ज केला. श्री जयस्वाल यांनी मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी व संबंधित विकासक यांची संयुक्त बैठक बोलवण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

श्री. सुभाष छापिया यांनी गोराई बोरीवली येथील अंगारकी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रलंबित कामकाजाबाबत लोकशाही दिनात अर्ज केला होता. सदर प्रकरणी सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. जयस्वाल यांनी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सन २००३ पासून आजतागायत प्रलंबित लेखापरीक्षण ४५ ते ६० दिवसात करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आजच्या लोकशाही दिनात मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाशी संबंधित ५, कोकण मंडळाशी संबंधित ६, मुंबई मंडळाशी संबंधित ३ , पुणे मंडळाशी संबंधित १ अशा एकूण १५ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

###

स्वाक्षरीत/-

(वैशाली गडपाले)

**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

Outward No. : 842/118 Dt. 15th September, 2025

**Press Release**

## 15 Applications Heard During the Thirteenth MHADA Lokshahi Din

Mumbai, 15 September, 2025: The 13th Lokshahi Din (Democracy Day) was organized today by the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) at Grihanirman Bhavan in Bandra East. A total of 15 applications from citizens were heard during the event, which was presided over by Shri Sanjeev Jaiswal (I.A.S.), the Vice President and Chief Executive Officer of MHADA.

During today's Lokshahi Din program, Shri Sanjeev Jaiswal, the Vice President and CEO of MHADA, made swift decisions, highlighting the importance of responsibility, transparency, and a just administration towards citizens.

Upholding its commitment to social responsibility, MHADA made a groundbreaking decision today. Shri Jaiswal promptly provided justice to the applicant, Shri Daulat Adhikari, by resolving his pending eligibility issue on the master list, which had been unresolved for about 15 years. The issue was related to an old dilapidated cess building in Kamathipura. The Adhikari family, who lived in an old cess building in Kamathipura, were relocated to a transit camp in Vikhroli provided by MHADA in 1976. Since the redevelopment of their building in Kamathipura could not take place, Shri Adhikari had applied in 2010 to be permanently included on the board's master list for a tenement. Due to discripancies in the documents, Shri Adhikari’s eligibility had been pending for about 15 years. Shri Adhikari, today presented his case to Shri Sanjeev Jaiswal during the Lokshahi Din. Shri Jaiswal understood the applicant's request and immediately ordered board officials to hold a hearing on the matter. Within a few hours of the Lokshahi Din, the officials heard Shri Daulat Adhikari's case and promptly announced his eligibility. Shri Adhikari was declared eligible for the master list in just four hours of the Lokshahi din hearing and was also given an eligibility confirmation letter to secure a permanent home.

In another case Shri Dnyandev Oroskar submitted an application at today's Lokshahi Din requesting that the loft area be included in the total area of his apartment, as it was not taken into consideration during the measurement of the apartment in the redevelopment of Tulsi Building in Lower Parel. Shri Jaiswal instructed the concerned officials that the Deputy Chief Engineer should hold a hearing on this matter within the next seven days and make a decision with the approval of the Chief Officer of the Mumbai Building Repair and Reconstruction Board.

While Shri Sahebrao Gaikwad was a successful applicant for an Economically Weaker Section (EWS) apartment in the Talegaon Dabhade housing scheme in Pune district through a computerized lottery. However, as a State Transport Corporation employee, Shri Gaikwad was delayed in paying the sale price of the apartment due to financial difficulties. As a result, the MHADA Pune board sent him a letter imposing a late fee of ₹75,000. He had applied at today's Lokshahi Din for the waiver of this late fee. During the hearing, Shri Sanjeev Jaiswal, considering the applicant's financial situation and with a sense of humanity, decided to waive the ₹75,000 late fee. Since Shri Gaikwad had paid the sale price of the apartment, Shri

Jaiswal instructed the relevant officials of the Pune board to give him possession of the apartment immediately tomorrow.

Smt. Riddhi Waje is a beneficiary of a MHADA computerized lottery, but it came to the board's attention that she owned two MHADA flat. As a result, she was not given possession of the flat she recently won in the lottery. She had applied for possession of the flat at today's Lokshahi Din. Based on the rule that an applicant can only benefit from a government housing scheme once, Shri Jaiswal instructed that one of the two apartments be taken back and possession of the recently won apartment be given to the applicant.

Shri Kamlesh Samdani applied at today's Lokshahi Din to gain possession of two rooms in Manek Building and Bai Motibai Temple Trust Building in Girgaon. Shri Jaiswal instructed the concerned officials to call a joint meeting with the Chief Officer of the Mumbai Building Repair and Reconstruction Board and the concerned developers.

Shri Subhash Chapiya had applied at the Lokshahi Din regarding the pending work of the Angarki Co-operative Housing Society in Gorai, Borivali. During the hearing, MHADA Vice President Shri Jaiswal instructed the concerned officials to issue an order to complete the pending audit of the co-operative housing society from 2003 to the present within 45 to 60 days.

During today's Lokshahi Din, a total of 15 applications were heard: 5 related to the Mumbai Building Repair and Reconstruction Board, 6 related to the Konkan Board, 3 related to the Mumbai Board, and 1 related to the Pune Board.

###

Sd/-
(Vaishali Gadpale)
**Chief Public Relations Officer, MHADA**

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

=================================================

Outward No. : 842/118 Dt. 15th September, 2025

## प्रेस विज्ञप्ति

# म्हाडा के तेरहवें लोकशाही दिन पर 15 मामलों की सुनवाई*

मुंबई, 15 सितंबर 2025 – महाराष्ट्र हाउसिंग एंड एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटी (म्हाडा) की ओर से आज बांद्रा (पूर्व) स्थित गृहनिर्माण भवन में तेरहवां लोकशाही दिन आयोजित किया गया। इस कार्यक्रम की अध्यक्षता म्हाडा के उपाध्यक्ष और मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल (IAS) ने की। इस अवसर पर नागरिकों द्वारा किए गए कुल 15 आवेदनों की सुनवाई की गई। श्री जयस्वाल ने कार्यक्रम के दौरान पारदर्शिता, जवाबदेही और न्यायपूर्ण प्रशासन के महत्व को दोहराया और हर मामले में तत्परता से निर्णय लिए।

आज के लोकशाही दिन में एक महत्वपूर्ण फैसला कामाठीपुरा के निवासी श्री दौलत अधिकारी के मामले में लिया गया। वे 1976 में कामाठीपुरा की एक पुरानी म्हाडा की सेस इमारत से विक्रोली स्थित संक्रमण शिबिर में स्थानांतरित हुए थे। उनकी सेस इमारत का पुनर्विकास नहीं हो पाया और उन्होंने 2010 में मास्टर लिस्ट मे पात्र होने के लिए आवेदन किया था, लेकिन दस्तावेज़ों में त्रुटियों के कारण उनकी पात्रता 15 सालों से अटकी हुई थी। लोकशाही दिन के मौके पर श्री अधिकारी ने श्री जयस्वाल के सामने अपनी बात रखी, जिसे समझते हुए श्री जयस्वाल ने तुरंत अधिकारियों को सुनवाई करने का आदेश दिया। मात्र 4 घंटों के भीतर श्री अधिकारी को मास्टर लिस्ट मे पात्र घोषित किया गया और उन्हें पात्रता पत्र भी श्री. जयस्वाल इनके द्वारा सौंपा गया।

लोअर परेल के श्री ज्ञानदेव ओरोसकर ने तुळशी बिल्डिंग के पुनर्विकास के दौरान अपने फ्लैट के नाप में पोटमाला (मेझानाइन फ्लोर) को शामिल करने की मांग की। श्री जयस्वाल ने उपमुख्य अभियंता को निर्देश दिए कि वे अगले 7 दिनों में इस मामले की सुनवाई कर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ के मुख्य अधिकारी की मंजूरी से निर्णय लें।

पुणे जिले के तळेगाव दाभाडे के श्री साहेबराव गायकवाड अत्यल्प उत्पन्न गट के अंतर्गत म्हाडा योजना में चयनित हुए थे, लेकिन पारिवारिक व आर्थिक परेशानियों के कारण वे समय पर फ्लैट की कीमत नहीं भर सके। इसके कारण पुणे म्हाडा कार्यालय ने ₹75,000 का विलंब शुल्क मांगा। लोकशाही दिन पर श्री गायकवाड ने शुल्क माफ करने की मांग की। श्री जयस्वाल ने मानवीय दृष्टिकोण से यह शुल्क माफ कर दिया और अधिकारियों को फ्लैट का कब्जा अगले ही दिन देने का निर्देश दिया।

श्रीमती रिद्धी वाजे, जो म्हाडा की हालिया कंप्युटराइज्ड लॉटरी की लाभार्थी हैं, उनके नाम पर दो फ्लैट पाए गए। नियमों के अनुसार कोई व्यक्ति सरकारी योजना में सिर्फ एक बार लाभ ले सकता है। इस पर श्री जयस्वाल ने आदेश दिए कि पहले वाला फ्लैट वापस लिया जाए और नई लॉटरी में मिला फ्लैट उन्हें सौंपा जाए।

श्री कमलेश समदानी ने गिरगांव की मानेक बिल्डिंग और बाई मोतीबाई टेम्पल ट्रस्ट बिल्डिंग में दो कमरों के कब्जे की मांग की। इस पर श्री जयस्वाल ने म्हाडा और संबंधित डेव्हलपर की संयुक्त बैठक बुलाने के निर्देश दिए।

गोराई-बोरीवली के श्री सुभाष छापिया ने अंगारकी सहकारी गृहनिर्माण संस्था के रुके हुए कामों को लेकर शिकायत की थी। इस मामले में श्री जयस्वाल ने अधिकारियों को निर्देश दिए कि 2003 से लंबित ऑडिट 45 से 60 दिनों के भीतर पूरा किया जाए।

आज के लोकशाही दिन में कुल 15 मामलों की सुनवाई हुई, जिनमें से 5 मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, 6 कोकण मंडळ, 3 मुंबई मंडळ और 1 पुणे मंडळ से संबंधित थे।###

Sd/-
(Vaishali Gadpale)
**Chief Public Relations Officer, MHADA**



